**सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९-०००३३६-२०२२**

**नियमित दिवाणी दावा क्र.७७/२०२२**

**निशाणी क्र.९८ वरील आदेश**

प्रस्ततुचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या विरुध्द पारित झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल होऊन कैफियत दाखल करुन घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.१ व २ यांना दाव्याची समन्स बजावणी झाली व ते याकामी हजर झाले. परंतू त्यांनी आपली कैफियत मुदतीत याकामी दाखल न केल्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द दि.२१/०२/२०२३ रोजी विनाकैफियत आदेश झालेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ व २ हे शेतकरी कुटुंबातील असून त्यांना कोर्ट कामाची पुरेशी माहीती नाही. सदर दाव्याचे अनुशंगे काही आवश्यक कागदपत्र प्रस्तुत प्रतिवादींस वेळीच हाती आलेले नाहीत, त्यामुळे त्यांना आपले वकीलांना भेटणे व मुदतीत कैफियत तयार करणे शक्य झाले नाही. सदर प्रतिवादींची कैफियत रेकॉर्डवर येऊन सदर दावा गुणदोषावर चालणे व निकाल होणे न्यायदृष्ट्या गरजेचे आहे. तसे न झाल्यास प्रस्तुत प्रतिवादींचे न्यायहक्कास बाध येऊन त्यांचे पैशांचे स्वरुपात कधीही भरुन येणार नाही असे अपरिमित नुकसान होणार आहे. सदर प्रतिवादी आजरोजी याकामी आपली कैफियत याकामी सादर करीत आहेत. सदर प्रतिवादींनी याकामी त्यांची कैफियत सादर करणेस मुद्दाम विलंब केलेला नसून तो केवळ प्राप्त परिस्थितीमुळे झालेला आहे. त्यामुळे याकामी प्रतिवादी क्र.१ व २ यांचे विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करण्यात यावा व सदर प्रतिवादींची कैफियत स्विकारणेत यावी अशी विनंती केली आहे..

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे देऊन विरोध दर्शवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा.

४. दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ हे आपल्या वकीलांमार्फत दाव्यात हजर झाले. परंतु त्यांनी आपली कैफियत निर्धारित कालावधीमध्ये दाखल केली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींविरुध्द विना कैफियत आदेश पारित करण्यात आला. त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि.१४/०९/२०२३ रोजी दाखल केला आहे. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांनी अर्जात कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाची नमुद केलेली कारणे स्वीकारार्ह नाहीत. परंतु, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होवून प्रकरणांची संख्या वाढून गुंता निर्माण होणार नाही. तथापि, झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादी यांच्यावर खर्च लादणे उचित दिसते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

– **आदेश** –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांना रक्कम रु.५००/– खर्चापोटी द्यावेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर विना कैफियत आदेश रद्दबातल करण्यात येईल.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड

दिनांकः १८/०३/२०२५